**इराण मधून भारतीयांच्या सुरक्षित माघारी साठी भारताचं ऑपरेशन सिंधू  (18 जून 2025)**

18 जून 2025

इराण आणि इस्त्रायल मधील वर्तमान संघर्षामुळे दिवसागणिक चिघळत चाललेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने, गेल्या काही दिवसांपासून इराण मधील भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि संरक्षणासाठी विविध पावले हाती घेतली आहेत.

2. पहिल पाऊल म्हणून, भारतीय दूतावासाने उत्तर इराण मधून 110 भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले आहे. सुरक्षित आश्रयासाठी अर्मेनियात पोहोचण्यासाठी  17 जून 2025 रोजी सहाय्य केले. इराण आणि अर्मेनियातील भारतीय मिशनच्या निगराणीखाली रस्ते मार्गाने येरेवन (अर्मेनियाची राजधानी) मध्ये विद्यार्थी दाखल झाले.  ऑपरेशन सिंधूच्या प्रारंभिक टप्प्यात, विद्यार्थी विशेष विमानाने येरेवन या ठिकाणाहून 18 जून 2025 रोजी 1455 वाजता रवाना झाले आहेत. 19 जून 2025 रोजी नवी दिल्ली येथे दाखल होतील.

3. माघारीची प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण केल्याबद्दल भारत सरकारने इराण व अर्मेनिया सरकारचे आभार मानले आहेत.

4. परदेशस्थ भारतीयांच्या नागरिकांची सुरक्षा आणि संरक्षणासाठी भारताचं नेहमीच सर्वोच्च प्राधान्य राहिलं आहे.  वर्तमान ऑपरेशनचा भाग म्हणून, इराण मधील भारतीय दूतावास इराण अंतर्गत सर्वाधिक जोखीम सावटाखाली असलेल्या क्षेत्रातून तुलनेने सर्वाधिक सुरक्षित असलेल्या क्षेत्रात नागरिकांना हलविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. उपलब्ध आणि सुयोग्य पर्यायांचा वापर करुन त्यांना सुरक्षित माघारी पाठविण्यासाठी देखील प्रयत्न आरंभिले आहे.

5. इराण मधील भारतीय नागरिकांनी आपत्कालीन हेल्पलाईनच्या माध्यमातून इराण स्थित भारतीय दूतावास आणि नवी दिल्ली येथे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वतीने स्थापित 24x7 नियंत्रण कक्षासोबत संपर्कात राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

6. तेहरान स्थित भारताच्या दूतावासाचे आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांक:

i. केवळ कॉल साठी: +98 9128109115, +98 9128109109

ii. व्हॉट्सअप साठी: +98 901044557, +98 9015993320, +91 8086871709

iii. बंदर अब्बास: +98 9177699036

iv. झाहेदान: +98 9396356649

v. ई-मेल- cons.tehran@mea.gov.in

नवी दिल्ली येथे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वतीने स्थापित 24 X 7 नियंत्रण कक्षाचा संपर्क क्रमांक:

800118797 (टोल फ्री), + 91-11-23012113, + 91-11-23014104, + 91-11-23017905

व्हॉट्सअप: +91-9968291988; ईमेल- situationroom@mea.gov.in

नवी दिल्ली

18 जून 2025